# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०२/२०२५ (बुधवार) दुपार**

---

## बुटीबोरी बालभारती मैदानाचे बाजुचे विहरीत पडुन झालेल्या प्राणांतिक अपघाता बाबत

**पोलीस स्टेशन बोरी :—** दिनांक १०/०२/२५ चे २२/०० वाजेच्या सुमारास मृतक / आरोपी सुरज सिध्दार्थ चव्हाण, वय —३४ वर्षे, रा. वार्ड क्र ०४ बुटीबोरी ता. जि. नागपूर याने त्याचे ताब्यातील सिल्व्हर रंगाची हुंडाईची आय १० क्र एम एच—०३ एड ब्ल्यु ४५०० ही चारचाकी गाडी म्हाडा कॉलनी ते एमआयडीसी निर्जन रोड वर बालभारती ग्राउंड जवळ भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने गाडी अनियंत्रीत होवुन रोड लगत असलेल्या विहीरीचे सिमेंट विटाचे कठड्याला धडक देवुन अपघातास कारणीभुत झाला. **तसेच झालेल्या अपघातामुळे गाडी विहीरीत पडुन विहीरीत पाणी जास्त असल्याने स्वत:चे आणि २. साजन सिध्दार्थ चव्हाण वय—२७ वर्षे वार्ड क्र ०४ बोरी ३.संदेश भरत चव्हाण ,वय—२७ वर्षे रा.ताजनगर बोरी ता जि नागपूर यांचे मृत्युस कारणीभुत** झाल्याने मृतक सुरज सिद्धार्थ चव्हाण यांचे विरूद्ध कलम २८१,१०६(१) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद आहे.

**यापुर्वी दिनांक १७/०५/२०२४ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामिण जिल्हा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद,नागपुर यांना वन्य परीसरात किंवा जंगलांना लागुन असलेल्या गावातमध्ये ज्या विहीरांना लोखंडी कठडे किंवा जाळया नाहीत अश्या विहीरीमध्ये पडुन कोणतेही प्राणी आणि मनुष्य जिवीतहानी होणार नाही याकरीता त्यांच्या अधिनिस्त असलेल्या विहीरींवर लोखंडी कठडे किंवा जाळया बसविण्याबाबत पत्र व्यवहार केला होता. तसेच दिनांक ११/०२/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले यांनी श्री सचिन दाते ,उप अभियंता, औदयोगिक क्षेत्र बुटीबोरी यांना फौजदारी नोटीस देवुन बुटीबोरी बालभारती मैदानाचे बाजुचे विहरीला सुरक्षा कठडे का लावले नाहीत ? तसेच विहीरीवर वरील भागस लोखंडी ग्रील किंवा सुरक्षितेबाबत उपाययोजना केल्या असत्या तर सदरची कार विहरीत पडली नसती आणि सदरचा अपघात घडुन आला नसता सदर अपघातास आपणास का जबाबदार ठरवु नये या बाबात स्पष्टीकरण मागितले आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर